// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक: ममआ/पात-स/एप्रि-2019/का-03/1037
दिनांक: 28/05/2019

प्रति,
मा.पोलीस आयुक्त,
मुंबई.

विषय :- डॉ.पायल तडवी यांच्या आत्महत्येच्या सखोल तपासासंदर्भात.

माननीय महोदय,

मुंबईतील नायर रुग्णालयातील एमडी अभ्यासक्रमाच्या शिकाऊ डॉक्टर पायल तडवी (वय 26) या तरुणीने रॅगिंग आणि वरिष्ठांच्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचे वृत्त माध्यमांमध्ये प्रसिध्द झालेले आहे. ही घटना अत्यंत गंभीर आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा, 1993 च्या कलम 10 (फ) 1 अन्वये या गंभीर घटनेची राज्य महिला आयोगाने स्वाधिकारे दखल घेतलेली आहे. या संदर्भात आपल्या हद्दीतील आग्रीपाडा पोलीस स्थानकामध्ये आत्महत्येच्या गुन्ह्याची नोंद झाल्याचे समजते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी सखोल तपास करणे गरजेचे आहे. म्हणून, आरोपींविरुध्द योग्य तो तपास करुन, आत्महत्येला प्रवृत्त करणे, दलित/आदिवासी अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि रॅगिंगविरोधी कायद्यान्वये कडक गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत बनले आहे. त्यामुळे आतापर्यंत पोलिसांनी या प्रकरणी केलेल्या तपासाचा अहवाल आठ दिवसांच्या आत राज्य महिला आयोग कायदा, 1993 च्या कलम 12 (2) व 12 (3) नुसार आयोगाच्या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

मा.अध्यक्षांच्या निर्देशानुसार, सविनय,

आपली स्नेहांकित,

(डॉ.मंजूषा सुभाष मोळवणे)
सदस्य सचिव (अ.का.)

प्रति,
मा.विशेष पोलीस महानिरिक्षक, महिला अत्याचार प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.